'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | E-ISSN : 2348-7
Impact Factor - (SJIF) - 6.625
Special Is
Peer Reviewed-Referred & Indexed
2 / 456

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International Multidisciplinary E-Research Journal**

**Peer Reviewed-Referred & Indexed Journal**

**April 2020 Special Issue –247**

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
M.S.G. Arts, Science & Commerce College, Malegaon Camp,
Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

**Swatidhan International Publications**
For Details Visit To : www.researchjourney.net

Cover Photo (From Internet) : Corona Wariors, Our Real Super Heroes

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-

Dist. Nanded

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**


**INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S**

# RESEARCH JOURNEY

**International Multidisciplinary E-Research Journal**

**Peer Reviewed-Referred & Indexed Journal**

**April 2020 Special Issue -247**




**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
M.S.G. Arts, Science & Commerce College, Malegaon Camp,
Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
April - 2020

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**Co-Editors -**

- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, Delhi, India
- **Prof. Milena Brotneva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur [M.S.] India
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon [M.S.] India
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, Goa, India
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, Goa, India
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur [M.S.] India
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, Trieste, **Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University Pune, **[M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar**, BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN 2348-7143
April - 2020

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

**Co-Editors -**

- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, Delhi, India
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, Sofia, Balgeria
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, Hydrabad, India
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, Saudi Arabia.
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon [M.S.] India
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur [M.S.] India
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. [M.S.] India
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon [M.S.] India
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, Goa, India
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, Goa, India
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur [M.S.] India
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon [M.S.] India
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari [M.S.]
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon [M.S.] India
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul [M.S.] India
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik [M.S.] India
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon [M.S.] India
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar [M.S.] India
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda [M.S.] India

**Advisory Board -**

- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, Trieste, Italy.
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow [U.P.] India
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, Goa, India.
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,Coimbatore
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University Pune, [M.S.] India
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar**, BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

Screenshot_20210709-123400~2.png

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
April - 2020

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded


| | | | |
|---|---|---|---|
| 26 | Comparative Study of Computer Literacy of Students of Junior College | Dr. Priya Kurkure | 120 |
| 27 | Women Empowerment through Five Years Plan | Dr. Vidya Jadhav | 125 |
| 28 | A Study of Noise Pollutation Measurments in Ambad and Satpur Industrial Areas Beloning in Nashik City | R. B. Bhise & S. V.Dhanwate | 131 |
| 29 | Traffic and Noise Pollution Survey In and Around Pune City (2012) | Dr. Pandurang Patil | 137 |
| 30 | Election and Voting Behaviour in India | Dr. Saroj Pandharbale | 143 |
| 31 | Comparative Federalism and its General Principles | Alka Patil | 146 |
| 32 | India's Border Management : Role of Central Armed Forces | Dr. P. A. Ghosh | 153 |
| 33 | Synthesis and Characterization of In2o3 Thin Films by Spray Pyrolysis Technique for Gas Sensing | N. B. Kothawade & S. V. Dhanwate | 162 |
| 34 | Contribution of Agriculture Sector towards A $5 Trillion Indian Economy | Dr. Rupali Deore | 171 |
| 35 | Online Annual Refresher Programme (ARPIT) 2018; Online Course (ARPIT-Library and Information Science) | Praful N. Kadu | 174 |
| 36 | Synthesis and Characterization of Molybdenum Oxide (Moo3) Thin Films by Spray Pyrolysis Technique for Gas Sensing | N.B. Kothawade & S.V. Dhanwate | 181 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 37 | अचला शर्मा के रेडिओ नाटक | डॉ. साधना भंडारी | 189 |
| 38 | भारतीय मुस्लिम नारी के अनकहें सवाल | डॉ. सुनील चव्हाण | 201 |
| 39 | अनामिका की कविताओं में स्त्री | डॉ. साईनाथ उमाटे | 207 |
| 40 | मुक्तिबोध के काव्य का नई कविता पर प्रभाव | डॉ. मिनल बर्वे | 212 |
| 41 | रेणु के कथा साहित्य में ग्राम समस्याएँ | डॉ. चिवाउर रहमान जाफ़री | 216 |
| 42 | अनुसूचित जनजाति : एक परीचय | डॉ. किरण कुंभारे | 220 |
| 43 | पंजाबी लोकगीतों में अभिव्यक्त सामाजिक जीवन | डॉ. गुरमोहिंदर सिंह | 228 |
| 44 | आओ लौट चले उपन्यास में चित्रित गांधीवाद | डॉ. कामिनी तिवारी | 235 |
| 45 | हिंदी के विकास में खानदेश के कवियों का योगदान | श्रीमती एच टी. पोटकुले | 243 |
| 46 | हिंदी लघुकथा में चित्रित नैतिक मूल्य | डॉ. शाहीन अब्दुल अज़ीज़ पटेल | 247 |
| 47 | डॉ. नीरजा माधव के साहित्य में अस्तित्व के प्रति नारी चेतना : विशेष संदर्भ 'यमदीप', 'मेधे जम्पा' और 'तेभ्यः स्वधा' | पद्मानंद सोनकाम्बले, डॉ. बी. डी. वाघमारे | 250 |
| 48 | 'जंगल का दाह' कहानी में चित्रित आदिवासी विमर्श | डॉ. संजय दवंडे | 254 |
| | **मराठी विभाग** | | |
| 49 | आदिवासी साहित्यातील प्रतिमासृष्टी | डॉ. माहेश्वरी गावित | 259 |
| 50 | द्वैती तत्वज्ञानाचा उद्गाता - महानुभाव संप्रदाय | डॉ. गणेश क. टाले | 266 |
| 51 | आधुनिकता, आधुनिकतावाद आणि मर्ढेकर व पु. शि. रेगे यांची कविता | डॉ. गोविंद कावरेकर | 272 |
| 52 | संत एकनाथांच्या गौळणी व विराण्या | डॉ. अंजली पांडे - जोशी | 279 |
| 53 | संत जनाबाईच्या साहित्यातून विठ्ठलभक्तीचे दर्शन | प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. राजेंद्र ठाकरे | 284 |
| 54 | शाहिरांच्या 'तमाशा' लोकरंग धारेतील 'गण' आणि 'गौळण' | डॉ. राजेंद्र वाटाणे | 288 |
| 55 | प्राचीन मराठीतील संत चरित्रकार : महिपतीबुवा ताहराबादकर | डॉ. गोपाल होले | 294 |
| 56 | समकालीन मराठी कविता | डॉ. रमाकांत कराड, डॉ. संभाजी शिंदे | 298 |
| 57 | १९७० नंतरचे मराठी नाटक | प्रा. नितीन मोटे | 308 |




https://mail.google.com/mail/u/0/#inbox/FMfcgzGkZQJmHHFdhhzxSVfNBHDLZHxB?projector=1&messagePartId=0.1 1/1

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
April 2020

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Seasonality and Parasitic Infection of Cestodes, Hexacanalis to Their Host Trygon Zugei From West Coast of India (MS) | R.R.Dandawate | 06 |
| 2 | Artefacts of the Imaginary : *Berlin Wall* in the Select Pop Cultural Texts | Prof. Ravindra Pratap Singh | 13 |
| 3 | Theme of Death in Beckett's Plays | Prof. Nitin Gohad | 18 |
| 4 | Empowerment of Women through Sports | Dr. Smita Chaudhari | 22 |
| 5 | Effect of Omission on General Theme in English Translation of *Yayati* | Mr. Anand Sanap | 25 |
| 6 | Evaluation of Pigmy Agents Human Resource Aspects in NACC Societies | Dr. B. S. Salunkhe | 28 |
| 7 | Evaluation of Rice Productivity in Gondia District of Maharashtra State | Dr. Lalitkumar Thakur | 32 |
| 8 | Exact Solution of Plane Symmetric Bianchi Type-I Space-Time in F(R) Theory of Gravity Using Power Law Relation | Dr. V. B. Raut | 37 |
| 9 | M. K. Gandhi Dead or Alive.......? | Mr. Pravin Patil | 43 |
| 10 | The Theatre of Cruelty : A Study of Vijay Tendukar's *Gidhade* (*The Vultures*) | Dr. Prashant Mannikar | 47 |
| 11 | Fibonacci Sequence, Golden Ratio and Golden Rectangle in Nature | Mr. Suraj Raut | 55 |
| 12 | Study of A Perfect Absorber Design Using Metamaterials for Harvesting Solar Energy | P.R. Dandwate, S.R. Dandwate & R.R. Dandwate | 61 |
| 13 | Humourous Characters in Jane Austen's *'Emma'* | Dr. Madhuri Chikhalkar | 66 |
| 14 | Representation of Socio-Economic Agony of the Dalit Family in the Story *'Kafan'* by Premchand | Dr. Chandrakant Mandlik | 70 |
| 15 | Algal Bio-Diversity of Pedhi River of Amravati District of Maharashtra, India | Dr. Swapna Kalbende | 73 |
| 16 | Noise Pollution of Commercial Zone of P.M.C and P.C.M.C. Area in Pune City (2012-2013) | Dr. Pandurang Patil | 78 |
| 17 | Comparative Study of Urban and Rural Students in Learning English | Mr. Manojkumar Navse | 82 |
| 18 | New Challenges for Indian Economy : A Critical Study | Dr. Rupali Deore | 88 |
| 19 | Study of Intercropping Orchards in Dhule District (M.S.) | Dr. Suresh Ahire | 91 |
| 20 | Effectiveness of Jigsaw Co-Operative Learning Technique Among B.Ed. Student Teacher For CCM-Geography Subject | Dr. Vandana Chaudhari | 96 |
| 21 | Electronic Commerce : Present Scenario in Indian Economy | Sonal Shinde & Dr. K.T. Khairnar | 100 |
| 22 | Investigation and Reporting of Hammer Headed Worm (Bipalium Kewense ) from Western Ghats Maharashtra, India | Dr. Ashok Pandharbale & Sanjaykumar Pokale | 105 |
| 23 | A Comparative Study of English Literary Criticism and English Literary Theory | Mr. Vinod Kukade | 107 |
| 24 | Role of Government Policy in Reducing Poverty in India | Mr Kamalesh Raut | 111 |
| 25 | Role of Nutrition in Stress Management | Anita Chandwani | 117 |

SHETKARI VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
April - 2020


| | | | |
|---|---|---|---|
| 58 | मराठी नाटकातील महात्मा गांधीचे विचार | डॉ. अंचली मस्करेन्हस | 313 |
| 59 | बारोमास : ग्रामीण वास्तवाचे दाहक दर्शन | डॉ. प्रवीण कारंजकर | 317 |
| 60 | अण्णाभाऊ साठे यांच्या वाङ्मयातील लोकसंस्कृती | डॉ. मता बावे | 321 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मचिकित्सा | सुनील वाघमारे, डॉ. भाऊसाहेब नवमाने | 326 |
| 62 | भारतीय स्वातंत्र्याचे क्रांतिसुक्त : पोवाडा | डॉ. राजेंद्र वाटाणे | 332 |
| 63 | मराठी साहित्य आणि मानसशास्त्र : परस्पर संबंध | डॉ. भास्कर शेळके | 337 |
| 64 | प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये योग शिक्षणाविषयी असलेल्या जाणीव-जागृतीचा अभ्यास | डॉ. राहुल सनेर, डॉ. तुषार माळी | 346 |
| 65 | महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा जिल्हा निहाय लोकसंख्येचा अभ्यास – एक दृष्टीकोन | प्रा. डॉ. आर.एम. बाविस्कर | 352 |
| 66 | इतिहास लेखनात द. बा. महाजन यांचे योगदान | डॉ. सिद्धार्थ जाधव | 357 |
| 67 | मुघल दरबारातील बातमीपत्रातून दिसून येणारा मुघल मराठा संघर्ष (इ.स.१६८०-१७०७) मराठवाड्याच्या विशेष संदर्भात | डॉ. सुनील पुरी | 361 |
| 68 | तणावाचे व्यवस्थापन | प्रा. गिरीश गवई | 368 |
| 69 | श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारे संचालित महाविद्लायांचे विद्यापीठ स्पर्धेतील व संस्था अंतर्गत सांघिक यशाचे विश्लेषण | प्रा. देवेंद्र वानखडे | 371 |
| 70 | राजकीय आधुनिकीकरण – एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 377 |
| 71 | ओपन सोर्स सॉफ्टवेअर्स : आजच्या ग्रंथालयाची गरज | प्रा. राजेश गेडाम | 382 |
| 72 | मेळघाट या दुर्गम क्षेत्रातील कोरकू आदिवासी संगीत संस्कृतीचे संक्षिप्त अध्ययन | डॉ. सारिका थावणे | 389 |
| 73 | साठोत्तरी मराठी नाटकातील सामाजिकता | डॉ. नितीन मोटे | 393 |
| 74 | यशवंतराव चव्हाण यांचा राष्ट्रीय संरक्षणविषयक दृष्टीकोन | डॉ. बाबासाहेब मोताळे | 399 |
| 75 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टीकोन | डॉ. शुभांगी लुंगे | 404 |
| 76 | महात्मा फुले आणि सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्य | प्रा. राजेश्वर दुडूकनाळे | 409 |
| 77 | महाराष्ट्रातील मच्छीमारांच्या समस्या – उपाय | डॉ. अंचली मस्करेन्हस | 414 |
| 78 | कोरोनाग्रस्त भारतीय अर्थव्यवस्था | डॉ. ए. डी. गोस्वामी | 419 |
| 79 | शेतीत सुक्ष्मसिंचनाबरोबरच नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची गरज | डॉ. दिपा होळकर | 424 |
| 80 | प्रसारमाध्यमे आणि साहित्य व्यवहार | डॉ. भास्कर शेळके | 430 |
| 81 | राजकीय संसूचन – एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 433 |
| 82 | मुलाखत : संवादाचे महत्त्वाचे माध्यम | डॉ. भाऊसाहेब नवमे | 440 |
| 83 | लोकसंस्कृतीचे उपासक - चित्रकथी आणि माकडवाले | डॉ. किरण पिंगळे | 445 |
| 84 | مراٹھی غزل تعارف اورآغاز و ارتقاء | ڈاکٹر قریشی عتیق احمد عبدالقدوس بنگولوی | 450 |


या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदर्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल. - मुख्य संपादक, रिसर्च जर्नी

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019) | April - 2020
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal

# महात्मा फुले आणि सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्य

**राजेश्वर दुडूकनाळे**
(देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड)
भ्रमणध्वनी : ९७६६८३७३९९, ८३२९०९८०४६
Email : duduknaleraj1978@gmail.com

एकोणिसावे शतक भारताच्या इतिहासात प्रबोधनाचे, जागृतीचे शतक म्हणून ओळखले जाते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर आदी समाजसुधारकांनी या शतकात समाजजागृतीचे कार्य हाती घेतले. महात्मा फुले यांनी क्रांतिकारी समाजसुधारक म्हणून या एकोणिसाव्या शतकावर आपली नाममुद्रा उमटवली आहे. फुले हे मानवी जीवनाचा वस्तुनिष्ठ, मूलगामी विचार करणारे तत्त्वचिंतक होते. छत्रपती शिवरायांच्या इतिहासातून प्रेरणा घेऊन आणि थॉमस पेनच्या 'राईट्स ऑफ मॅन' या ग्रंथाने प्रभावित होऊन त्यांनी आपल्या समाजकार्याला सुरुवात केली. सामाजिक गुलामगिरीच्या विरुद्ध बंड पुकारले. मानवी स्वातंत्र्याचा जयघोष केला.

**भारतीय इतिहासातील आदर्श दांपत्य :**

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले हे भारतीय इतिहासातील एक महान आणि आदर्श दांपत्य आहे. पती-पत्नी मिळून सामाजिक क्रांतीच्या कार्यात सक्रीय सहभाग नोंदविल्याची उदाहरणं भारतीय समाजात मोजकीच पहावयास मिळतात. अगदी प्राचीन काळाचा विचार केला तर शिव-पार्वती हे सिंधू संस्कृतीतील दांपत्य यादृष्टीने अत्यंत उल्लेखनीय ठरते. मध्ययुगीन कालखंडाचा विचार करता शहाजीराजे भोसले आणि राजमाता जिजाऊ हे दांपत्य उल्लेखनीय ठरते.

एकोणिसाव्या शतकातील अत्यंत क्रांतिकारी, विवेकी, चिकित्सक, अभ्यासू, कृतीशील पती-पत्नी म्हणून महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा उल्लेख करावा लागेल. फुल्यांच्या प्रत्येक सामाजिक उपक्रमाला सावित्रीबाईंचा जसा सक्रीय पाठिंबा होता, तसा सावित्रीबाईंच्या प्रत्येक कृतीउक्तीला फुल्यांचे पाठबळ होते. दोघांच्याही विचारात आणि कृतीत कमालीची एकनिष्ठता दिसून येते. ही एकनिष्ठता आधुनिक काळातील दाम्पत्यांना प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणारी आहे. मानवी स्वातंत्र्याची प्रबळ इच्छाशक्ती असणारे हे दांपत्य खऱ्या अर्थाने भारतीय समाजाचे नायक-नायिका होत.

फुल्यांच्या सत्यशोधकी, विद्रोही चळवळीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदानही अनन्यसाधारण आहे. भारतीय समाजातील पहिली शिक्षिका म्हणून बहुजनांच्या उन्नतीसाठी केलेले समाजकार्य अत्यंत क्रांतिकारी आहे. मूल्यसंपन्न समाजनिर्मितीसाठी केलेली धर्मचिकित्सा, विद्रोही जाणिवा व्यक्त करणाऱ्या साहित्याची निर्मिती, गुलामीला आपल्या कृतीतून दिलेले उत्तर विद्रोही, सत्यशोधकी विचारधारेला संपन्न करणारे ठरते.

**विवेकी धर्मचिकित्सा :**

आधुनिक काळात भारतामध्ये विवेकी धर्म चिकित्सेला महात्मा फुले यांच्यापासून सुरुवात झाली. १८१८ साली पेशवाईचा राजकीय अस्त झाला होता. त्यामुळे इंग्रजी साम्राज्यामुळे भारतीय समाज अनेक अंगांनी प्रभावित होऊ लागला. इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेली एक पिढी भारतीय समाजाचा नव्याने विचार करू लागली. या पिढीतील अत्यंत महत्त्वाचे आणि क्रांतिकारी नाव म्हणजे महात्मा फुले।



https://mail.google.com/mail/u/0/#inbox/FMfcgzGkZQ.lmHHFTSkmbJpbJzmkZStMR?projector=1&messagePartId=0.1 1/1

Screenshot_20210709-123440~2.png

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
April - 2020

निर्लज्य सोवळें त्यांचे अधिष्ठान ॥
भोंदीती निदान ॥ शुद्रादीक ॥ ३ ॥
ब्राह्मणांनीं नित्य होऊनी निःसंग ॥
शूद्र केलें नंग ॥ जोती म्हणे ॥ ४ ॥"[३]

अशा प्रकारचे फुल्यांचे अखंड म्हणजे विद्रोहाचा अग्नीच होत. धर्माच्या क्षेत्रातील ढोंगीपणा, दांभिकता त्यांनी अनेक अखंडातून दाखवून दिली.

**अंतरी कमालीची करुणा :**

समाजातील पाखंडीपणावर, दांभिकतेवर प्रहार करताना फुल्यांची भाषा अधिक आक्रमक होते. परंतु या आक्रमक भाषेच्या पाठीमागे मानवतावादाचा सुगंध दडलेला आहे. सत्य हाच धर्म मानणारे महात्मा फुले मनाने खूप संवेदनशील आहेत. म्हणून डॉ. आ. ह. साळुंखे यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना "वज्रापेक्षाही कठोर, फुलापेक्षाही हळुवार" असे विधान केले आहे. त्यांच्या हृदयात मानवजातीबद्दल प्रचंड करुणा आहे. याचा प्रत्यय त्यांच्या पुढील अखंडातून येतो.

"ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी ॥
धरावे पोटाशीं ॥ बंधूपरी ॥
मानव भावंडे सर्व एकसहा ॥
त्याजमध्यें आहां । तुम्ही सर्व ॥"[४]

महात्मा फुले यांनी आपल्या लेखनातून अनेक ठिकाणी कर्मठ ब्राह्मणांवर अत्यंत कठोर शब्दात प्रहार केले आहेत. शोषकांचा वर्ग म्हणून त्यांचा धिक्कार केला आहे. ब्राह्मण 'शोषक' म्हणून फुल्यांना अमान्य आहे. तो 'माणूस' म्हणून किंबहुना भाऊ म्हणून मान्य आहे. याबाबतीत डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, "फुल्यांनी एकीकडे ब्राह्मणांवर अत्यंत कठोर टीका केली आहे, परंतु दुसरीकडे मानव भावंडांमध्ये त्यांचा अंतर्भाव करून भावाप्रमाणे त्यांना पोटाशी कवटाळण्याची भाषा केली आहे. ब्राह्मण शोषक म्हणून नको असले, तरी भाऊ म्हणून हवे आहेत, असा याचा अर्थ होतो."[५] या विवेचनावरून फुल्यांची माणूसपणावर असलेली निष्ठाच अधोरेखित होते. एकूणच, फुल्यांच्या विद्रोहात्मक समाजसंघर्षामध्ये नकारात्मक जाणिवांबरोबरच उदात्त मानवी मूल्यांच्या स्वीकाराचा भाग फार महत्त्वाचा आहे. या जीवनमूल्यांच्या गर्भातून आधुनिक काळातील लोकशाहीचे सर्जन झाले आहे.

**विचाराला कृतीची जोड :**

स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव या मूल्यांवर महात्मा फुले यांची अपार निष्ठा होती. प्रत्यक्ष जीवनात या मूल्यांना प्रमाण मानून जगणारा, 'बोले तैसा चाले' ही उक्ती सार्थ करणारा महापुरुष म्हणजे महात्मा फुले!

फुल्यांच्या समाजकार्याचे वेगळेपण म्हणजे ते एकाबाजूला लिहीत होते आणि दुसऱ्या बाजूला तशी कृती करीत होते. अर्थातच त्यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाला प्रत्यक्ष कृतीचा आधार होता. शोषकांच्या व्यवस्थेला फुल्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिलेले उत्तर म्हणजे भारतीय समाजाचा नव्या दिशेने सुरू झालेला प्रवास होता. हा प्रवास अनेक अंगांनी आणि अनेक अर्थांनी महत्त्वाचा होता. शूद्र, अतिशूद्र आणि महिलांनी शिक्षण घेणे धर्माने



https://mail.google.com/mail/u/0/#inbox/FMfcgzGkZQJmHHFLQDzpXpWhmWpFNpNv?projector=1&messagePartId=0.1

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
April - 2020

फुल्यांनी भारतातील सामाजिक विषमतेची मूळं शोधण्यासाठी मोठ्याप्रमाणात धर्मचिकित्सा केली. वैदिक धर्मव्यवस्थेकडून हजारो वर्षांपासून चातुर्वर्ण्याच्या आधारे बहुसंख्य लोकांचे अनेक अंगांनी शोषण चालू होते. अशा सामाजिक, धार्मिक गुलामगिरीतून समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी वैदिक धर्माची कठोर चिकित्सा केली. ही चिकित्सा करताना हजारो वर्षांपासून चालत आलेले व्यक्तिप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, धर्मप्रामाण्य आणि विभूतीपूजा त्यांनी नाकारली. पुरोहीतशाहीचे वर्चस्व झुगारून लावले. 'सत्यासत्यासी मन केले ग्वाही मानियले नाही बहुमता' ही भूमिका घेऊन फुल्यांनी कर्मठपणा, दांभिकता आणि शोषणावर हल्ला चढवला.

**विद्रोही महापुरुष :**

महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील पहिले बंडखोर महापुरुष होत. वैदिकांच्या साहित्याची, धर्माची आधुनिक काळात प्रथमच महात्मा फुल्यांनी चिकित्सा करून बंड पुकारले. विचार आणि कृती यात कमालीचे साम्य असणारा आधुनिक भारताचा शिल्पकार म्हणजे म. फुले यांचे व्यक्तिमत्त्व होय. महात्मा फुले यांच्या बंडखोरीबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "भारतातील परंपरागत समाजसंस्थांच्या विरुद्ध बंड करणारे पहिले पुरुष म्हणजे जोतीबा फुले होत. अशा बंडाची प्रेरणा त्यांना कुठून मिळाली? भारतातील परंपरावादी समाजसंस्थांची व या समाजसंस्थांच्या नियमधर्मांची पकड हजारो वर्षे येथील जनमनांत पक्की बसलेली होती. या ठिकाणी सामाजिक जन्मसिद्ध उच्चनीच भाव हे ईश्वरी संकेताने व माणसांच्या पूर्वकर्माने निर्माण झालेले आहेत, म्हणून यांच्या विरुद्ध प्रयत्न करणे, हे महापाप आहे अशी समजूत होती. या महापापाची म्हणजेच अपवित्रतेची भीती येथील जनमानसात कायम घर करून बसली होती. ही खोलपणे सहस्त्रावधी वर्षे रुजलेली भीती घालविणारी जबरदस्त प्रेरणा जोतीबा फुले यांना कुठून मिळाली?"[१] प्रत्यक्ष जीवनात फुल्यांना आलेले अनुभव आणि समाजातील शोषण यामुळे त्यांच्यातील तत्त्वचिंतक जागा झाला. त्यांच्यातील हा तत्त्वचिंतकच विद्रोहाला जन्म देतो.

महात्मा फुले यांनी व्यापक समाजहित समोर ठेवून समाजप्रबोधनासाठी आणि नवसमाजनिर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. 'शेतकऱ्याचा असूड', 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचे कसब', 'सार्वजनिक सत्यधर्म' या महत्त्वाच्या ग्रंथांबरोबरच त्यांची 'अखंड' रचनाही शोषकांच्या व्यवस्थेवर जबरदस्त प्रहार करणारी आहे. समाजातील पाखंडीपणावर प्रहार करताना महात्मा फुले म्हणतात,

"जप अनुष्ठानें स्त्रिया मुलें होती ॥
दुजा कां करीती ॥ मुलासाठीं? ॥ १ ॥
भट ब्राह्मणांत बहु स्त्रिया वांझ ॥
अनुष्ठानीं बीज ॥ नाहीं का रे ॥ २॥"[२]

स्वतःच्या स्वार्थासाठी जप अनुष्ठान घालणाऱ्या पुरोहित वर्गाला वरील अखंडातून महात्मा फुल्यांनी अत्यंत मार्मिक प्रश्न विचारला आहे. दुसऱ्या एका अखंडामध्ये फुले म्हणतात,

"कल्पनेचे देव कोरीले उदंड ॥
रचीले पाखांड ॥ हितासाठीं ॥ १॥
किन्नर गंधर्व ग्रंथी नाचवीले ॥
अज्ञ फसवीले ॥ कृत्रिमानें॥ २॥

Screenshot_20210709-123451~2.png

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 247 | April - 2020
Peer Reviewed-Referred & Indexed Journal

सामाजिक लोकशाहीला जन्म देते. भारतीय समाजाला नवी दिशा देते. सर्व प्रकारच्या गुलामीतून समाजाला मुक्त करू पाहते. प्रत्येकाला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्य प्राप्त करून देणे, हेच महात्मा फुल्यांच्या संघर्षाचे ध्येय होते. म्हणून फुले हे आधुनिक भारताच्या इतिहासातील सामाजिक, धार्मिक स्वातंत्र्याचे प्रणेते होत.

**संदर्भसूची :**

१. फडके य. दि. (सं.) : महात्मा फुले समग्र वाङ्मय, म. रा. सा. आणि सं. मंडळ मुंबई, चौ. आ. १९९१, पृ. १६.
२. तत्रैव, पृ. ५३५.
३. तत्रैव, पृ. ५४२.
४. तत्रैव, पृ. ५३७.
५. साळुंखे आ. ह. : महात्मा फुले आणि धर्म, लोकवाङ्मय गृह मुंबई, नऊवी आ. २००९, पृ. १७,१८.
६. फडके य. दि. (सं.) : महात्मा फुले समग्र वाङ्मय, उनि. पृ. १७.
७. खरात शंकरराव : अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे, द्वि. आ. २००४, पृ. ५.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded



https://mail.google.com/mail/u/0/#inbox/FMfcgzGkZQJmHHFLHRZPszlNCHLXWV?projector=1&messagePartId=0.1 1/1